दि. 07 डिसेंबर,2013

# भाड्याचे स्टिंग कॅमेरे- अरुण जेटली

अरुण जेटली (विरोधी पक्षनेते-राज्यसभा)

इकॉनॉमिक टाईम्स च्या 4 थ्या पानावर आज एक रिपोर्ट आला आहे, ज्याचे शीर्षक आहे "डू किंग्ज ऑफ स्टिंग ऑपरेशन्स फेस अ क्रेडिट डेफीसिट?"

याचा सारांश असा आहे की, नुकत्याच काही वर्षात अनेक वेबसाईट आल्या आहेत. अधिकतर वेबसाईटसना स्टिंग ऑपरेशन्स मध्ये विशेषता प्राप्त आहे. त्यांच्याकडे आपले अस्तित्व टिकविणे अथवा टिकून राहण्यासाठी वित्तीय मॉडेल नसतो. त्यांनी आता सोसायटी आणि गैर लाभकारी संस्थांच्या रुपात आपली नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे. कारण पारदर्शकतेपासून बचाव होईल जी कंपनी कायद्या अंतर्गत नोंदणीकृत एखाद्या कंपनीबरोबर असते. कोणत्याही कंपनीला नियमित खाते ठेवावे लागते आणि त्या खात्याचा तपशील आणि बॅलंस शीट प्रत्येक वर्षी रजिस्ट्रार ऑफ कंपनीला जमा करावी लागते. हे कोणत्याही व्यक्तीद्वारे प्राप्त केले जाऊ शकते. यामुळे कंपनीची वित्तीय स्थिती पारदर्शी राहते. ही सुविधा अशा स्थितीत उपलब्ध राहत नाही जर ती संचालक कंपनी नसेल.

मी याआधीही सांगितले होते की, अशा अनेक वेबसाईटचा उपयोग गैर कॉंग्रेसी नेत्यांना निशाणा बनवण्यासाठी केला जात आहे. यामध्ये जराही शंका नाही. श्री नरेंद्र मोदी हे त्यांच्या निशाण्यावर मुख्य करुन आहेत. नुकतेच अशाच प्रकारची चौकशी आम आदमी पार्टीवर निशाना बनवून केली गेली होती. कोणत्याही प्रकारच्या वित्तिय मॉडेलच्या अभावात वेबसाईट आपले अस्तित्व वाचवण्यासाठी देणगीवर अवलंबून आहे.

अदृश्य आणि अपारदर्शी धन कोणत्याही संस्थेच्या विरोधात संशय निर्माण करते. अशा प्रकारच्या संस्था देणगीवर चालत असतात. सत्यता ही आहे की, सरकार आणि कॉंग्रेस पार्टीला सामान्यतः अशा वेबसाईटकडून निशाणा बनविला जात नाही ज्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होईल. जे तारणहार बनण्याचे सोंग रचतात, त्यांना असे वाटते की ते स्वतः स्वच्छ आहेत. ते अन्य लोकांना पारदर्शिता आणि खुलेपणाचा धडा देतात आणि याचा इतका अतिरेक होतो की काही तथ्य बाहेर आणण्यासाठी स्टिंग ऑपरेशनची मदत घ्यावी लागते. त्यांचे स्वतःचे अस्तित्त्व

अज्ञात स्त्रोतांवर आधारित आहेत. आता वेळ आली आहे की, वेबसाईटसना आपले वित्तिय स्त्रोत, आपले उद्देश आणि निवडक लोकांना निशाणा बनविण्याचे उद्देश याबाबतीत सार्वजनिकपणे सर्व माहिती दयायला पाहिजे.

नाहीतर असा संशय राहील की हे भाड्याचे स्टिंग कॅमेरे आहेत.